# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-202

# करियर कट्टा उपक्रमांतर्गत बाळासाहेब देसाई महाविद्यालयास ४ पुरस्कार

▲पाटण, दि. १० : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत पाटण येथील कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित बाळासाहेब देसाई महाविद्यालयास ४ पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) 'ए' प्लस श्रेणीसुद्धा प्राप्त झाली आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम नेहमीच सुरू असतात. उच्च शिक्षणाला बळ मिळावे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टा हा अभिनव उपक्रम गेल्या चार वर्षांपासून सुरु आहे. या उपक्रमांतर्गत सन २०२३-२४ या वर्षात घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२३-२४ चा निकाल जाहीर करण्यात आला. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणला पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



पुरस्कार स्वीकारताना डॉ. एस. डी. पवार, समवेत प्रा. श्री गणेश गायकवाड.

यामध्ये सातारा विभागामध्ये उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय यामध्ये द्वितीय क्रमांक मिळाला आहे. उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट जिल्हास्तरीय तालुका समन्वयक म्हणून प्रा. श्रीगणेश गायकवाड यांना प्रथम क्रमांक तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून प्रा. विशाल कांबळे यांना प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. डॉ. संदीप तडाखे यांची सातारा जिल्हा करियर कट्टा जिल्हा समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयास ४ पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विक्रमसिंह पाटणकर आणि पाटण विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे नेते, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांनी अभिनंदन केले. कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशराव पाटील, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ.सुहास देशमुख, संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हाण तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्रशासकीय सेवक या सर्वांनी अभिनंदन केले.